**सार्वजनिक ठिकाणी आधार नोंदणी केंद्राची उभारणी करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः मातंसं २०१३ / प्र.क्र.१०५ / ३९**
सामान्य प्रशासन विभाग, (माहिती तंत्रज्ञान )
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२
तारीख: २० मार्च, २०१३

**परिपत्रक:**

रहिवाश्यांची आधार नोंदणी करण्याबाबत संपूर्ण देशभरात महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. राज्यामध्ये आधार नोंदणीचे काम राज्य शासनातर्फे नियुक्त केलेल्या संस्थेमार्फत तसेच नॉन स्टेट रजिस्ट्रार अंतर्गत विविध बँका, एन.एस.डी.एल., इंडिया पोस्ट तर्फे सुरु आहे.

आधार नोंदणी करताना यापुढे नोंदणी केंद्र हे सार्वजनिक ठिकाणीच उदा. शासकीय इमारती, शाळा, महाविद्यालये इत्यादी ठिकाणी असणे आवश्यक आहे. नोंदणी संस्थांमार्फत नोंदणी केंद्रांमध्ये नोंदणीच्या मार्गदर्शक सूचनांचा दर्शनी भागावर फलक लावणे आवश्यक आहे. फलकावर नोंदणी प्रक्रिया, फॉर्मस् इत्यादी पूर्णपणे मोफत असल्याचा उल्लेख करावा याची संपूर्ण जबाबदारी नोंदणी संस्थांची राहिल. जिल्हाधिकारी, महानगर पालिका आयुक्त यांनी आधार नोंदणीच्या कामावर सनियंत्रण ठेवावे. ज्या नोंदणी केंद्रावर गैरप्रकार घडत असतील अशा ठिकाणी संबंधित ऑपरेटर, सुपरवायझर यांच्या विरुद्ध कडक कारवाई करावी व गरज भासल्यास पोलिसांकडे तक्रार करावी. असे असूनही एखाद्या नोंदणी संस्थेच्या ऑपरेटर, सुपरवायझर कडून अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असल्याचे आढळून आल्यास संबंधित नोंदणी संस्थेच्या जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक तसेच राज्य प्रकल्प व्यवस्थापकाविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०३२०१७०१३५३३११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhogle Santosh Haridas

Digitally signed by Bhogle Santosh Haridas
DN: CN = Bhogle Santosh Haridas, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Department of Information Technology
Reason: I am the author of this document
Location: Mantralaya
Date: 2013.03.20 17:10:52 +05'30'

**(डॉ. संतोष भोगले)**
**अवर सचिव, महाराष्ट शासन**

प्रत,

१. सर्व जिल्हाधिकारी
२. महानगर पालिका आयुक्त
३. सर्व आधार नोंदणी संस्था